**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २९ ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

- **राज्य विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी, भाजप आणि कॉंग्रेस प्रदेशाध्य्यक्षसह विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांकडून अर्ज दाखल.**
- **मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ज्ञ पुढे सरसावले, सदिच्छादूत करणार मतदान करण्याचे आवाहन.**
- **दीपोत्सवातील धनत्रयोदशीच्या सणाचा आज सर्वत्र उत्साह, आयुर्वेद दिन विविध कार्यक्रमांनी साजरा.**
- **आरोग्याशी संबंधित १२ हजार ८५० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन आणि भूमिपूजन.**

अर्ज दाखल

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी आपापले अर्ज दाखल केले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज शक्तिप्रदर्शन करत कामठी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. अर्ज दाखल करण्यापूर्वी बावनकुळे यांनी महालक्ष्मी जगदंबा मंदिर कोराडी इथ दर्शनासाठी पोहोचले, पुढील पाच वर्ष कामठीतील मतदार मला सेवेसाठी देतील अशी भावना चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केली.

***आई महालक्ष्मी जगदंबेचा आशीर्वाद आहे. दीड लक्षच्यावर परिवाराची माझं व्यक्तिगत संबंध आहे, पारिवारिक संबंध आहे आणि मला माझे मतदार समजून घेतील. मी कामठी विधानसभेला वेळ देऊन, राज्यातही वेळ देणार आहे. निश्चितपणे कामठी विधानसभेची जनता मला या ठिकाणी प्रचंड मताने विजयी करून देतील.***

आज समीर मेघे यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी शिवाजी महाराज चौक, हिंगणा इथं आयोजित रॅली उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले. त्यांतर दुपारी भाजपचे नागपूर-मध्यचे उमेदवार प्रवीण दटके, नागपूर-उत्तरचे उमेदवार मिलिंद माने आणि नागपूर-पश्चिमचे उमेदवार सुधाकर कोहळे यांनी आपापले उमेदवारी अर्ज दखल केले. दरम्यान नागपूर ग्रामीणच्या उमरेड मतदारसंघात महायुतीतर्फे भाजपचे सुधीर पारवे यांना उमेदवारी देण्यात आली आहे त्यांच्यासमोर काँग्रेसचे संजय मेश्राम यांच आवाहन राहणार आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज भंडारा जिल्ह्यातील साकोली मतदारसंघातून अर्ज भरला. यावेळी त्यांनी महाराष्ट्रामध्ये सत्ता परिवर्तन होण्याचा विश्वास व्यक्त करून सरकारच्या धोरणावर टीका केली.

***महाराष्ट्र मध्ये महाविकास आघाडीच सरकार, बहुमताच सरकार महाराष्ट्र मध्ये येणार हे काळ्या दगडा वरची पांढरी रेष. महाराष्ट्रामध्ये ज्या पद्धतीने छकुली आंबेडकर विचाराला संपवण्याचे पाप भाजप प्रणित एकनाथ शिंदेचे सरकार करते आहे, त्याच्या विरोधात लोकांमध्ये भयानक राग आहे. शेतकरी अडचणीत आहे, तरुण अडचणीत आहेत, महिला असुरक्षित आहे, महागाई खूप वाढलेली आहे, आणि सरकार जाणूनबुजून या महाराष्ट्रामध्ये करते महाराष्ट्र विकण्याचे काम करते आहे.***

काँग्रेसचे जेष्ठ नेते आणि माजी मंत्री डॉ. नितीन राऊत आज उत्तर नागपूर मतदारसंघातून विधानसभा उमेदवारी अर्ज दाखल केला. उमदेवारी अर्ज भरण्याअगोदर सकाळी संविधान चौक इथ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला त्यांनी अभिवादन केलं. काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांनी पश्चिम नागपूरसाठी , गिरीश पांडव पुर्व नागपुरातून, प्रफुल गुडधे पाटील दक्षिण पश्चिम आणि बंटी शेळके यांनी मध्य नागपुरकरिता आपापले उमेदवारी अर्ज भरले. या प्रसंगी माजी खासदार विलास मुत्तेमवार, माजी मंत्री सतीश चतुर्वेदी, महाराष्ट्र काँग्रेसचे, आमदार अभिजित वंजारी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अनेक पदाधिकारी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. **अमरावती** मतदारसंघांमधून महाविकास आघाडीचे उमेदवार काँग्रेसचे डॉ.सुनील देशमुख आणि महायुतीच्या उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुलभा खोडके यांना उमेदवारी जाहीर झाली असून त्यांनी आज आपले नामांकन सादर केले. अमरावतीच्या मोर्शी विधानसभा मतदार संघातून विद्यमान आमदार देवेंद्र भुयार यांना राष्ट्रवादीने उमेदवारी जाहीर

केली आहे. याच मतदार संघात भाजपतर्फे उमेश यावलकर यांना उमेदवारी देण्यात आली असून देवेंद्र भुयार यांनी स्वाभिमानी शेतकरी पक्षाच्या तिकिटावर 2019 मध्ये तत्कालीन कृषिमंत्री डॉ.अनिल बोंडे यांचा पराभव केला होता. त्यानंतर 2019 मध्ये त्यांनी महाविकास आघाडीला पाठिंबा दिला होता राष्ट्रवादी मधील फुटी नंतर ते अजित पवार गटामध्ये आमदार आहेत. भाजप तर्फे या मतदारसंघात उमेश यावलकर यांना उमेदवारी देण्यात आली असून महाविकास आघाडी तर्फे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने गिरीश कराळे यांना मोर्शीतून उमेदवारी दिली आहे. या मतदारसंघात महायुतीचे दोन उमेदवार असल्याने मैत्रीपूर्ण लढत होत असल्याचं स्पष्टीकरण काल उपमुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी दिल आहे. **गोंदिया** जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांची उमेदवारी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षांने नकरल्या नंतर आज त्यांचे पुत्र डॉ.सुगत चंद्रिकापुरे यानी प्रहार संघटनेच्या वतीने अर्जुनी मोरगाव विधानसभे करिता नामांकन अर्ज दाखल केला आहे. गोंदिया विधानसभा क्षेत्राचे महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षाचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांनी आज गोंदियात शक्ती प्रदर्शन करीत नामांकन अर्ज दाखल केला.

सदिच्छादूत

विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा, मतदान हक्काचे महत्व सांगण्यासाठी निवडणूक आयोगाच्यावतीनं मतदारजागृतीचे विविध उपक्रम राबविले जात आहेत. मतदार जागृतीच्या या उपक्रमांना कला, क्रीडा, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची 'सदिच्छादूत' म्हणून साथ लाभली आहे. हे सदिच्छादूत मतदारांना मतदान करण्यासाठी आवाहन करणार आहेत. समाज माध्यमे, मुद्रित माध्यमे आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांबरोबरच जाहिरात फलक, भित्तीपत्रकाद्वारे हे सदिच्छादूत लोकशाही सुदृढ करण्यासाठी मतदान करण्याचे आवाहन करीत आहेत. राज्यस्तरीय सदिच्छादूतांमध्ये पद्मभूषण अणुशास्त्रज्ञ डॉ.अनिल काकोडकर, साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, अभिनेते प्रशांत दामले, अभिनेत्री मृणाल कुलकर्णी, अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड, अभिनेत्री उषा जाधव, महिला क्रिकेटपटू स्मृती मनधना, सुवर्णपदक विजेती नेमबाज राही सरनोबत, अर्जुन पुरस्कार सन्मानित महिला धावपटू ललिता बाबर, अर्जुन पुरस्कार सन्मानित जलतरणपटू वीरधवल खाडे, तृतीयपंथी

कार्यकर्त्या श्रीगौरी सावंत, तृतीयपंथी प्रणीत हाटे, तृतीयपंथी झैनब पटेल, दिव्यांग कार्यकर्ता निलेश सिंगीत, दिव्यांग कार्यकर्ती आणि साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या लेखिका सोनाली नवांगुळ यांचा समावेश आहे.

एकता दौड

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त नवी दिल्लीत आज एकता दौडीचं आयोजन करण्यात आलं होतं. दरवर्षी ३१ ऑक्टोबरला आयोजित केली जाणारी ही एकता दौड यावर्षी दिवाळीमुळे दोन दिवस आधीच म्हणजे आज घेण्यात आली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या एकता दौडीला हिरवा झेंडा दाखवला. एकता दौड ही देशाच्या एकतेसाठीच नाही, तर विकसित भारताचा संकल्प देखील असल्याचं शहा यावेळी म्हणाले. केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. देशात इतरत्रही एकता दौडीचं तसंच सतर्कता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

एकता दिन

यंदा गुजरात मधील केवडिया इथं होणाऱ्या राष्ट्रीय एकता दिन समारोहाची मध्यवर्ती संकल्पना 'रायगड किल्ला' ही असून, रायगडला युनेस्को तर्फे 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून जाहीर करण्यात आलं आहे. रायगड हे मराठा वास्तुकलेच एक उत्कृष्ट उदाहरण असून, या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे असाधारण शौर्य, पराक्रम आणि नाविन्यपूर्ण युद्ध कला याबद्दल अनेक शौर्य गाथांची नोंद आहे. राष्ट्रीय एकता दिनानिमित्त केवडिया इथं रायगड दुर्गाची प्रतिकृती तयार करण्यात आली आहे.

धनत्रयोदशी

देशभरात आज दिवाळीचा दुसरा दिवस म्हणजेच धनत्रयोदशी साजरी होत आहे. आजच्या दिवशी धनाची आणि धानाची तसंच देवांचे वैद्य असलेल्या धन्वंतरींची पूजा केली जाते. धणे आणि गूळ यांचा नैवेद्य दाखवला जातो. या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान धन्वंतरींच्या कृपेमुळे सर्वांना आयुष्य, आरोग्य, आनंद आणि समृद्धी लाभो, अशी शुभकामना करतो, असं त्यांच्या समाज माध्यमावरच्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. आज साजऱ्या होणाऱ्या आयुर्वेद

दिनानिमित्तही पंतप्रधानांनी समाज माध्यमावरच्या संदेशात शुभेच्छा दिल्या आहेत. निरोगी जीवनशैलीसाठी आयुर्वेद उपयुक्त ठरतो. भगवान धन्वतंरींची जयंती ही आयुर्वेदाच्या उपयुक्ततेशी आणि योगदानाशी निगडित असल्याचं पंतप्रधानांनी शुभेच्छा संदेशात सांगितलं आहे. देशांतर्गत सराफा बाजारात आज धनत्रयोदशीच्या दिवशी सोन्याच्या किमतीत प्रतितोळा ५०० रुपयांची घट झाली आहे. २४ कॅरेट सोन्याची किंमत आज ८० हजारांवरून घसरून ७९ हजार ७९० रुपये झाली आहे तर २२ कॅरेट सोन्याचा दर ७३ हजार १४० रुपये झाला आहे. चांदीच्या दरात मात्र कोणताही बदल झालेला नसून चांदीचा दर ९७ हजार ९०० रुपये प्रतिकिलो इतका आहे. दरम्यान, धनत्रयोदशीनिमित्त सोनं-चांदी खरेदी करताना ग्राहकांनी हॉलमार्कची खात्री करावी असं आवाहन भारतीय मानक ब्युरोनं केलं आहे. धनत्रयोदशीला या मौल्यवान धातूंची खरेदी करण्याची प्रथा आहे, त्या पार्श्वभूमीवर ग्राहकांना हॉलमार्क असलेल्या दागिन्यांचं महत्त्व पटवून देण्याचा उद्देश असल्याचं ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं म्हटलं आहे.

आयुर्वेद दिन

आयुर्वेदाला आधुनिक वैद्यकशास्त्राशी जोडून आरोग्य क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू झाला असून आता आयुर्वेद क्षेत्रात नवं संशोधन होईल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. धन्वंतरी दिन आणि नवव्या आयुर्वेद दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आरोग्याशी संबंधित जवळपास १२ हजार ८५० कोटी रुपयांच्या योजनांचा प्रारंभ पंतप्रधानाच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. ज्या देशाचे नागरिक निरोगी असतात त्या देशाची प्रगती वेगाने होते, असं सांगत ते म्हणाले की प्रतिबंधात्मक उपाय, वेळेवर रोगाचं निदान, मोफत आणि स्वस्त उपचार, छोट्या शहरांमध्ये डॉक्टरांची कमतरता दूर करणं आणि आरोग्य सेवेत तंत्रज्ञानाचा विस्तार हे आरोग्य धोरणाचे पाच स्तंभ केंद्र सरकारने ठरवले आहेत. या कार्यक्रमात आज पंतप्रधानाच्या हस्ते आरोग्य सेवा आणखी सुधारण्यासाठी विविध आरोग्य संस्थांचं उद्घाटन आणि पायाभरणीही झाली.

******